प्र.१ “लालच बुरी बला होती है” , या उक्तीच्या आधारे हिंदी / इंग्रजी भाषेत सुमारे ४०० शब्दांत कथालेखन करा. (१५)

किंवा

प्र.१ “कोशिश करनेवालोंकी हार नही होती है” , या उक्तीच्या आधारे हिंदी / इंग्रजी भाषेत सुमारे ४०० शब्दांत कथालेखन करा. (१५)

प्र.२ अ. “तरुणींवरील वाढते हल्ले” या विषयावर दोन महाविद्यालयीन तरुणींचा संवाद लिहा. (८)

ब. अलीकडे तुम्ही पाहिलेल्या मराठी / हिंदी चित्रपटाचे परीक्षण / समीक्षण लिहा. (७)

किंवा

प्र.२ अ. आजच्या तरुण पिढीतील वाढती व्यसनाधीनता किंवा सुप्रीम कोर्टाची महाराष्ट्रातील डान्सबारवरील बंदी या विषयावर दोन समाजसेवक किंवा ज्येष्ठ नागरिक यांच्यातील संवाद लिहा. (८)

ब. विजय तेंडुलकर किंवा पु. ल. देशपांडे यांच्या कोणत्याही एका पुस्तकावर परीक्षण लिहा. (७)

प्र.३ सुप्रसिद्ध गायिका किंवा राजकीय नेता यांची काल्पनिक मुलाखत सुमारे ४०० शब्दात लिहा. (१५)

किंवा

प्र.३ ‘मुलाखत’ प्रकाराची चर्चा करा. दूरचित्रवाणीवरील मुलाखतीची वैशिष्ट्ये लिहा. (१५)

प्र.४ **पुढील उतारा वाचून त्यावर आधारीत प्रश्नांची उत्तरे लिहा.** (१५)

फॅशन हा एक वर्तनप्रकार आहे. तिचा संबंध वेशभूषा, आभूषणे, सजावट, फर्निचर, गृहरचना यांच्याशी असतो. विचारसरणीच्या बाबतीतही फॅशनचा प्रभाव दिसून येतो. फॅशनवरुन व्यक्तीचे समाजातील स्थान, तिचा दर्जा लक्षात येऊ शकतो. शैली किंवा स्टाइल कलेसंबंधी असते. शैलीतून सौंदर्य रचना, सौंदर्यनिर्मिती प्रकट होते. एखादी गोष्ट ठराविक कालावधीकरिता फारच प्रचलित असते. उदा. एखादा सजावटीचा प्रकार. अभिरुची ही मूल्यांसंबंधी असते. यात आत्मनिष्ठा निर्णयाला अधिक महत्त्व असते. काही रंग डोळ्यांना सुखावतात म्हणून त्यामध्ये अभिरुची असते. तर केवळ फॅशन म्हणूनही काही रंग निवडले जातात. कधीकधी फॅशनमध्ये अभिरुची आठळते, तर कधी तिला मुरड घालावी लागते. कित्येक वेळा असे होते, की एका समूहात फॅशन कालबाह्य झालेली असते तर तीच दुसऱ्या समूहात लोकप्रिय असते.

फॅशन हा एक सामूहिक वर्तनप्रकार आहे. नेतृत्व, व्यापक सूचन, सामाजिक सुलभीकरण, विवेकी आणि अविवेकी घटक त्यात अंतर्भूत असतात. फॅशनमुळे अभिवृत्ती आणि कृती यांत झपाट्याने बदल होतो. फॅशनचे अनुकरणदेखील फार झपाट्याने होते. फॅशनमध्ये मान्यतेचा आणि अमान्यतेचा अंश असतो. त्यात भावनिक समाविष्ठ असते. तथाकथित सद्वर्तनी (मॉरलिस्ट) व्यक्ती फॅशनकडे काहीशा उपहासाने पाहते, तर सामान्य माणसाला त्याचे काहीच वाटत नाही. फॅशन आणि खूळ (फॅड) यांच्यात फरक आहे. खूळ हे व्यक्तिविशिष्ठ असते व ते कित्येकदा समाजमान्य नसते. खूल काही ठराविक लोकांपुरतेच मर्यादित असते. तर फॅशन ही मोठ्या जनसमूहाची प्रातिनिधिक असते. एखाद्या फॅशनविरहीत व्यक्तीत काही आगळी अभिरुची दिसत असेल तर ते खूळ समजावे. त्यात अनपेक्षितता, बेजबाबदारपणा असते आणि ते अल्पजीवीही असते.

(मागे पहा...)

अ. फॅशनचा संबंध कशाशी असतो ?

ब. फॅशनमधील रंग याबद्दल उताऱ्यात लेखकाने काय मत व्यक्त केले आहे ?

क. फॅशन मध्ये काय अंतर्भूत आहे ?

ड. फॅशन व फॅड (खूळ) यातील फरक लिहा.

इ. फॅशन विरहीत व्यक्तीच्या बाबतीत लेखकाने काय मत व्यक्त केले आहे ?

**किंवा**

**प्र.४ पुढील उतारा वाचून त्यावर आधारीत प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(१५)**

निबंधसाहित्यात निबंधकाराच्या व्यक्तिमत्त्वालाही अर्थातच महत्त्व असते. त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा त्याने निवडलेले विषय, त्यांची केलेली मांडणी आणि त्याची भाषाशैली यांवर उमटलेला असतो. याचा अर्थ निबंध हा प्रकृतीने वस्तुनिष्ठ लेखनप्रकार असला तरी त्यात लेखकाच्या आत्मनिष्ठेचे दर्शन सूचकपणे घटतेच. शैलीसारख्या किंबहुना निबंधातून सूचित झालेल्या मतांसारख्या गोष्टींवरुन हे दर्शन घडते. कोणतेही लेखन हे पूर्णपणे वस्तुनिष्ठ असणे अशक्य आहे. अगदी ऐतिहासिक वा वैज्ञानिक विषयांवरील लेखनही अल्प प्रमाणात का होईना, लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचे निदर्शन ठरते.

आधुनिक निबंधसाहित्य हे गद्यातच असते. तथापि गद्यसाहित्याचा उदय व्होण्यापूर्वी सगळेच लेखन पद्यातून होत असे. आपल्याकडे महाभारतातील राजधर्मासारखे (शांतिपर्व) प्रकरण हे द्यातील निबंधसाहित्य म्हणता येईल. रामदासांनी लिहिलेली काही प्रकरणे – उदा. राजधर्म, सेवकधर्म यांचे स्वरुप स्थूलमानाने निबंधवजाच म्हणता येईल. इंग्रजीत अठराव्या शतकात अलेक्झांडर पोप या कवीने ॲन एसे ऑन क्रिटिषम व ॲन एसे ऑन मॅन या नावांच्या कविताच लिहिलेल्या आहेत व त्यांत विचारप्रर्वतनालाच महत्त्व आहे. तेव्हा गद्य आणि पद्य ही माध्यमे निबंधाच्या हेतूशी संवादी असली, तरी प्रत्यक्षात मात्र निबंध साहित्यप्रकाराचा सोळाव्या शतकानंतरचा जो इतिहास आहे. तो गद्यातील निबंधासंबंधीचाच आहे.

अ. निबंधसाहित्यातील निबंधकाराचे महत्त्व सांगा.

ब. निबंधात लेखाचे व्यक्तिमत्त्व कसे दिसते ?

क. पद्यलेखनाबाबत लेखकाने कोणती उदाहरणे दिली आहेत ?

ड. अलेक्झांडर पोपचा उल्लेख उताऱ्यात कशासंदर्भात आला आहे ?

इ. निबंध साहित्यप्रकाराच्या इतिहासाबद्दल लेखकाने काय मत व्यक्त केले आहे ?